मेट्रो सिटी
दिशा नागरीकरणाची

10 Mar 2016 Sakal

## बीआरटी मार्ग की वाहनतळ...




येरवडा : येथील रहिवाशांनी बीआरटी मार्गात उभी करण्यात आलेली खासगी वाहने.

# वाघोली बीआरटीवर १४० बस

## टर्मिनलचा प्रश्न मार्गी लागल्याने पीएमपीचे नियोजन

**पुणे, ता. ९ :** नगर रस्त्यावरील वाघोलीत टर्मिनल उभारण्याचा प्रश्न सुटल्यामुळे बीआरटी मार्गावर सुमारे १४० नव्या बस धावणार आहेत. त्या बसला दोन्ही बाजूने दरवाजे असतील. टर्मिनल उभारणीचे काम महापालिकेने पूर्ण केल्यावर नगर रस्त्यावर बीआरटी मार्गात वाहतूक सुरू करण्याचे नियोजन पीएमपीने केले आहे.

नगर रस्त्यावर येरवड्यातील पर्णकुटी चौक ते वाघोलीदरम्यान १३ किलोमीटर बीआरटीचा मार्ग आहे. त्याच्या उभारणीचे काम सहा महिन्यांपूर्वीच पूर्ण झाले आहे. विश्रांतवाडी बीआरटीचा गेल्या वर्षी १५ ऑगस्टला प्रारंभ झाला आहे. त्याला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. मात्र, वाघोलीतील जागेच्या प्रश्नामुळे नगर रस्त्यावरील बीआरटी रखडली होती. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने टर्मिनलसाठी जागा देण्याचे ठरविले आहे. बीआरटी मार्गाचे काम पूर्ण झाले आहे. या मार्गावरील १२ स्थानकांवर स्वयंचलित दरवाजे असतील. त्यावर वाहतूक नियंत्रक दिवे, पादचारी मार्ग, रस्ता ओलांडण्यासाठी सुविधा तयार झाल्या आहेत, अशी माहिती पीएमपीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मयुरा शिंदेकर यांनी दिली.

या मार्गावर वाहतुकीसाठी १४० बस असतील. त्यांच्यासाठी 'इंटेलिजन्ट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम' (आयटीएमएस) यंत्रणा बसविण्याचेही काम सुमारे ७० टक्के पूर्ण झाले आहे. त्यामुळे या मार्गावरील बसमध्ये प्रवासी किती आहेत, बसचा वेग किती आहे, किती थांब्यांवर ती थांबली आदींची माहिती पीएमपीच्या नियंत्रण कक्षात उपलब्ध होणार आहे. वाघोलीत सुमारे अडीच एकर जागेवर महापालिका टर्मिनल उभारणार आहे. त्यात वाहकांसाठी शेड, कर्मचाऱ्यांसाठी कक्ष, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आदी सुविधा अपेक्षित आहेत. या मार्गावरील बीआरटीचा फायदा वाघोली, वडगाव शेरी, खराडी, चंदननगर, केसनंद आदी भागांतील प्रवाशांना होणार आहे. तसेच बीआरटी मार्गात खासगी वाहनांची घुसखोरी होऊ नये, म्हणून महापालिकेच्या सहकार्याने तेथे रक्षकही नियुक्त करण्यात आले आहेत.

खासगी वाहने बीआरटी मार्गात गेल्यास वाहतूक पोलिसांकडून त्यांच्याकडून कारवाई होणार असल्याचेही शिंदेकर यांनी स्पष्ट केले.

### अतिक्रमणांवर कारवाई करा

**वाघोलीतील टर्मिनलचे काम तातडीने सुरू करतानाच बीआरटीसाठी पूरक पायाभूत सुविधांचेही काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी नागरिक चेतना मंचच्या कनीज सुखरानी यांनी केली आहे. नगर रस्त्यावरील पदपथांशेजारी उभ्या राहणाऱ्या अनधिकृत वाहनांवर पोलिसांनी कारवाई करावी, तसेच या रस्त्याच्या दुतर्फा अतिक्रमणे हटविल्यास खासगी वाहनांसाठी पुरेशी जागा उपलब्ध होईल. तसेच फेरीवाल्यांचेही पुनर्वसन करावे, असेही त्यांनी महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. या रस्त्यावर खासगी प्रवासी वाहतूक करण्यासाठी थाटलेल्या स्टॉल्सवर प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) कारवाई करावी, तसेच बीआरटी मार्गात खासगी वाहने जाणार नाहीत, यासाठी पुरेशा संख्येने वाहतूक पोलिस नियुक्त करावेत, अशीही मागणी सुखरानी यांनी केली आहे.**